**दोषारोपपत्रासोबत दाखल दोन्ही जात प्रमाणपत्रांच्या छायाप्रती आजरोजी साक्षीदार क्र. ४ चंद्रभागा एकनाथ उदमले यांनी सोबत आणलेल्या मुळ जात प्रमाणपत्रांवरून पडताळून दोषारोपपत्रासोबत दाखल असलेल्या छायाप्रतिंना निशाणी क्र. ६० व ६१ दिले.**

<u>विशेष खटला क्र १० सन २०१७</u> निशाणी ५३

**साक्षीदार क्र. ४**

**इन कॅमेरा...**

***<u>उलट तपास आरोपी १ ते ४ तर्फे विधीज्ञ श्री ए. बी.आंधळे -</u>***

६. मला तारीख, वार व वेळ हे समजते. पोलीसांनी माझा जबाब दिनांक १७.१२.२०१६ रोजी आमच्या गावात घेतला. त्याच्यानंतर मी पुन्हा पोलीसांकडे गेले नव्हते, हे म्हणणे खरे आहे. पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला. आरोपींना आमच्या वावरातून रस्ता हवा होता, असे मी पोलीसांना सांगितले नव्हते. आरोपींना पूर्वी आमच्या वावरातून रस्ता नव्हता, म्हणून त्यांनी ओढयातून रस्ता काढावा असे मी पोलीसांना सांगितले नव्हते. शांताबाईने काटे काढून टाकायला सांगितले व तिने ते फेकून द्यायला सुरूवात केली, मी त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला, असे मी पोलीसांना सांगितले नव्हते. दत्तात्रय गवांदेने देखील शिवीगाळ केली, ते बोलले, "हे चमटे चंभारडे लई माजले, यांच्याकडे पहावेच लागणार, यांच्या आईची गांड". दत्तात्रय गवांदेने, "तुझे दोनही मुलांच्या आज मी आंड गोळया काढुन घेईन, तुझे हातावर देईन, तुला चाळीस लोकं झवले, तुम्ही छिन्नाल आहे, तुम्ही चमटया मारल्या मुलीला, तुमच्याकडे पहावेच लागतं" अशी शिवीगाळ केली, असे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. पोलीसांसमोरील जबाबात याचा उल्लेख का नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

७. तक्रार दिल्यानंतर पोलीसांनी मला घुलेवाडी रूग्णालयात पाठविले, तेथे एक दिवस ठेवले, मग मी माझ्या घरी गेले, असे मी पोलीसांना सांगितले होते का, हे मला आठवत नाही. पोलीसांनी तो उल्लेख माझ्या जबाबात का केला नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

८. आमच्या गावातील गजानन घुले यांना मी ओळखते. त्यांचे आणि माझे चांगले संबंध आहेत. आमच्या व आरोपींच्या वादामध्ये गजानन घुलेंनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला का, हे मला माहिती नाही. आरोपींनी मला तीन लाख रूपये

दिले असते तर, मी रस्त्याचा वाद सोडून दिला असता, हे म्हणणे चुकीचे आहे. हे पैसे मी गजानन घुलेंमार्फत मागितले, हे म्हणणे खरे नाही. संध्याकाळी ६.३० ते ७.३० च्या दरम्यान आम्ही पोलीसांकडे फिर्याद द्यायला गेलो होतो, हे म्हणणे खरे नाही. साक्षीदार सांगतो की, त्या सकाळी १०.३० वाजता फिर्याद द्यायला गेल्या होत्या.

९. माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. २ ते ४ मध्ये जे मी सांगितले, ते खोटे सांगितले, हे म्हणणे खरे नाही. आरोपींनी मला व माझ्या मुलीला जातीवाचक शिवीगाळ केली व मारहाण केली, हे मी खोटे सांगते, हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

उलट तपास पुर्ण.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-
(मंदार नेरलेकर)
अति. सत्र न्यायाधीश
संगमनेर

संगमनेर
दिनांक: ०८/१०/२०२५